१२. भारतकारांचे मते धर्माचे ज्ञापक प्रमाण

(संदर्भ : 'शांतिपर्व व अनुशासनपर्व ह्यांतील बुद्धिगम्य धर्म' श्रीभाऊजी दप्तरी यांचा लेख)

॥श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

जीव हा मुळात ब्रह्मच असून खोट्या अभिमानामुळे तो आपल्या मूळच्या सावधानतेपासून तर भ्रष्ट झालाच, पण याशिवाय जोपर्यंत हा त्याचा अभिमान आत्मज्ञानाने नष्ट होत नाही, तोपर्यंत व्यवहारांत देखील त्याच्या विचारादि ज्ञानक्रियेत खोटा अभिमान उत्पन्न करून वस्तूचे यथार्थ ज्ञान तो होऊ देत नाही. व्यवहारात अनेक वेळा मनुष्या मनुष्यात जे वाद उपस्थित होतात, किंवा मतभेद होतात ते सर्व खोट्या अभिमानाचाच परिणाम होत. ह्या अभिमानाचा प्रभाव वर्णन करिताना श्रीज्ञानेश्वरमहाराज एके ठिकाणी म्हणतात -

नवल अहंकाराची गोठी । विशेष न लागे अज्ञानापाठी ।
सज्ञानाचें झोंबे कंठीं । नाना संकटीं नाचवी ॥

म्हणजे या अहंकाराची अशी विलक्षण गंमत आहे की ज्याप्रमाणे पेहेलवानांना आपल्यासमोर दंड थोपटून पुढे आलेल्या माणसाशी दंड थोपटून सामना घ्यावासा वाटतो, त्याप्रमाणे बुद्धीचा अभिमान बाळगणाऱ्या पुरुषाची बुद्धी जेव्हा श्रद्धेचा तिरस्कार करून आपल्या विचाररूपी बाहूला थोपटून पुढे होते, तेव्हा अभिमानाला (त्याच्याच) ते सहन न झाल्यामुळे, तिला चीत करण्याकरिता तोहि आपले अवधानरूपी बाहु थोपटून पुढे सरतो. अशा वेळी ज्या बुद्धीला आत्मज्ञानाचे बल प्राप्त झाले आहे, ती खेरीज करून, बाकीच्या सर्व बुद्धींचा पाडावच होतो व अहंकाराचाच जय होतो. ज्याप्रमाणे बलवानाची बाधा विनीताला होत नाही, किंवा त्यापेक्षा अधिक शक्तिमान् असणाऱ्याला होत नाही. त्याप्रमाणेच अहंकाराच्या विपरीत ज्ञानाची बाधा अज्ञान्याला म्हणजे श्रद्धावानाला किंवा आत्मज्ञानसंपन्न पुरुषाला होत नाही, एरवी आत्मज्ञान नसता नुसत्या व्यावहारिक ज्ञानाचा किंवा शास्त्रज्ञानाचा अभिमान बाळगणाऱ्या सर्वांना त्या विपरीत ज्ञानाची बाधा होते. म्हणजे तो खोट्यालाच खरे समजून चालतो व बुद्धीच्या बलावर तो आपले म्हणणे सिद्ध करू पाहतो. पण त्यात अहंकारामुळे, बुद्धीचे बल कोठे क्षीण झाले, किंवा बुद्धीचा डावपेच कोठे चुकला, हे त्याचे त्याला समजून येणार नाही इतक्या

शिकवीत अहंकार त्या बुद्धीला चीत करून ठेवितो.

वास्तविक पाहता मनुष्याला श्रद्धेचा तिरस्कार करून आपल्या बुद्धीचा ताठा बाळगण्याचे कांही कारण नाही. कारण परमेश्वराने मनुष्याला बुद्धि दिली असल्यामुळे, जरी तो मधून मधून तिचा उपयोग करितो, व आपण केलेला व्यवहार किंवा मिळविलेले ज्ञान बुद्धीच्या साह्याने मिळविलेले आहे, म्हणून निर्दोष आहे असे त्याला वाटते, तरी सर्वस्वी श्रद्धेला सोडून देऊन नुसत्या बुद्धीने मनुष्य कांहीएक करीत नाही. मी बुद्धीच्या धोरणाने चालतो असे त्याला वाटते हा त्याचा केवळ भ्रम असतो. उलट लोकमान्यांनी म्हटल्याप्रमाणे त्याचे सर्व व्यवहार श्रद्धाप्रेमादि नैसर्गिक मनोवृत्तीनेच चाललेले असतात. या नैसर्गिक मनोवृत्तीस थोडा आळा घालण्यापलीकडे मनुष्याची बुद्धि दुसरे कांही करीत नाही. म्हणजे मनुष्य नुसत्या श्रद्धेने किंवा बुद्धीनेच नेहमी वागतो असे नसून दोघांचेहि साह्य घेतो, व त्यातहि बुद्धीला देखील कोणत्यातरी निश्चित श्रद्धेचा आधार असतोच, म्हणून बुद्धी नेहमी निश्चित ठरलेल्या श्रद्धेच्या परतंत्रच आपले काम करीत असते. ह्या ठिकाणी बुद्धीचे काम म्हणजे आपल्या श्रद्धेचा बचाव करणे हेच होय पण अशाप्रसंगी जेव्हा व्यावहारिक श्रद्धा व तिचा बचाव करण्याकरिता सरसावलेली बुद्धी, आणि पारमार्थिक श्रद्धा व तिचा बचाव करण्याकरिता पुढे झालेली बुद्धी, ह्यांचा सामना होतो, तेव्हा व्यावहारिक श्रद्धेचा बचाव करण्याकरिता सज्ज झालेल्या बुद्धीत खोटा अभिमान उत्पन्न होऊन तो मग आत्मज्ञानाच्या सान्निध्याने उत्पन्न होणाऱ्या यथार्थ विचारांना व श्रद्धेला बुद्धीत शिरू देत नाही; एवढेच नाही तर त्या बुद्धीची फसगत करून खोटी श्रद्धा व खोटे विचार दृढ करवितो. अर्थातच या अभिमानाने ग्रासलेल्या बुद्धीचे विचार लंगडे असतात; म्हणजे ते एक प्रकारचे चुकीचे डावपेच असतात. अशा वेळी मनुष्याला आपला खोटा दुराग्रह दिसत नाही, आपल्या बोलण्यातील पूर्वापर विरोधाकडे त्याचे लक्ष राहत नाही, प्रतिपक्षी व आपण ह्यात विरुद्धांश किती आहे हे तो पाहात नाही, आणि खंडन मंडनाच्या भरात प्रसंगविशेषी अभिनिवेशाने शब्दार्थांची ओढाताणहि करितो.

सारांश, मनुष्य हा श्रद्धामय आहे, व म्हणूनच सात्त्विक माणूस सात्त्विक श्रद्धेमुळे आधिभौतिक सुखापेक्षा व शास्त्रापेक्षा आध्यात्मिक सुखाकडे व शास्त्राकडे ओढला जातो. राजस तामस पुरुष आपआपल्या गुणानुसार श्रद्धेने आध्यात्मिक

सुखाला व शास्त्राला सोडून आधिभौतिक सुखाच्या व शास्त्रांच्या पाठीमागे लागतात. जो ज्या गुणाचा असतो, तो त्या गुणाच्या शास्त्राध्ययनात आपला काळ घालवितो; व त्या त्या व्यासंगानुसार त्या त्या शास्त्रांच्या विचारसरणीचा त्याला अभिमान उत्पन्न होतो. ज्यांना आधिभौतिक शास्त्राध्ययनाची संवय लागलेली असते, ते नेहमी बाह्य परिणामावरून कोणत्याही बाजूचा विचार करीत असल्यामुळे, त्यांची तत्त्वज्ञानदृष्टि संकुचित होते, आणि मग ते विचार करते वेळी आध्यात्मिक व पारलौकिक किंवा अव्यक्त कारणांस विशेष महत्व देत नाहीत.

पाश्चात्य राष्ट्रे ह्या दृष्टीचाच चित्रपट आहेत. त्यांच्या संसर्गाने हिंदुस्थानातील आमचे सुशिक्षित लोकहि हिंदुस्थानाला त्या चित्रपटाची रंगभूमि बनवू पाहत आहेत. वास्तविक पाहता हिंदुसंस्कृतीचे खरे व प्राचीन स्वरूप आध्यात्मिकदृष्टिप्रधान आहे, व ते मानणारे जुने लोक होत. प्राचीन संस्कृतीस अनुसरून विचार करणारे लोक म्हणजे केवळ अंधविश्वासी व नवे लोक म्हणजे मोठे बुद्धिमान असा मुळीच अर्थ नाही. नवे लोक विशेषतः अध्यात्मिक बाजूकडे दुर्लक्ष करून आधिभौतिक देखावा व शास्त्रे सत्य मानतात, आणि आपल्याला गुरुप्रमाणे वाटणाऱ्या पाश्चात्य लोकांच्या विचारसरणीवर विश्वास ठेवून त्यांचे मत स्थापन करण्याचा प्रयत्न करितात. ह्याच्या उलट जुने लोक विशेषतः आध्यात्मिक वस्तूचे सत्यत्व जाणून आधिभौतिकाकडे दुर्लक्ष करितात, आणि आपल्या पूर्वाचार्यांच्या विचारसरणीवर श्रद्धा ठेवून त्यांचे मत मंडन करितात.

सारांश जुने लोक व नवे लोक असे दोघेही आपल्या व्यवहारात व ज्ञानार्जनात बुद्धि व श्रद्धा अशा दोन्ही मनोवृत्तींचा अवलंब करितात व प्रत्येकजण आपल्या श्रद्धेला जपतो. त्यातल्या त्यात बारीक विचार करून पाहिले असता, आधिभौतिक विचारसरणीमुळे तात्त्विक दृष्टि संकोचित होते, म्हणून बुद्धीची तात्त्विक दृष्टि विस्तृत करणारे, अध्यात्मशास्त्रे व त्यातील विचारसरणी व तिचा अभिमान बाळगणारे जुने लोकच अधिक सूक्ष्म बुद्धीचे असण्याचा संभव असताना, नव्या लोकांना जुने लोक अंधश्रद्धाळू व गतानुगतिक वाटतात. आणि आपण स्वतः मात्र त्यांना मोठे चिकित्सक, सत्यान्वेषी व प्रागतिक आहेत असे वाटते हे मात्र आश्चर्य आहे.

हा उपोद्घात् करण्याचे कारण म्हणजे श्रीयुत दप्तरी ह्यांचा 'शांतिपर्व

२

व अनुशासनपर्व ह्यांतील बुद्धिगम्य धर्म' या मथळ्याखाली आलेला लेख होय. श्री. दप्तरी हे विचारी व नव्या विचारसरणीचे अभिमानी आहेत, व त्याच दृष्टीने त्यांनी शांतिपर्व व अनुशासनपर्व ह्यातील वचनाधारे ज्ञापक प्रमाणाचा विचार करून ''धर्म हा पुरुषबुद्धिगम्य आहे'' असे ठरविले आहे. ह्याच्या उलट आम्हाला जुनी मतेच, सोपपत्तिक असून शांतिपर्वातील वचनावरूनहि तेच मत सिद्ध होते असे प्रामाणिकपणे वाटते; म्हणजे धर्म हा पुरुषबुद्धिगम्य नसून ईश्वरबुद्धिगम्य आहे व पुरुषाला त्या ईश्वरबुद्धीचा लाभ झाला असता नंतर त्याच्या त्या बुद्धीनेही धर्म कळू शकतो - तोपर्यंत नाही; असे आम्ही म्हणतो. श्री. दप्तरीनी आपले मत आज पुनः जगापुढे मांडिले आहे, म्हणून वाचकांच्या विचाराकरिता आम्हीही जुने मत लोकांपुढे मांडीत आहो. आम्ही आपले मतहि, युक्तीने व श्री. दप्तरी यानी उदाहृत केलेल्या वचनांच्या आधारानेच, मांडीत असल्यामुळे निराग्रह वाचकांना आपल्या बुद्धीने खऱ्याखोट्यांचा निर्णय करण्यास सुलभ जाईल.

जुने लोक धर्म हा बुद्धिगम्य नाही असे म्हणतात; त्याचे कारण ते असे देतात की, (१) धर्माचे साध्य पारलौकिक सुख हे एक असलेच पाहिजे. (२) व पारलौकिक सुखाची साधने पुरुषाच्या बुद्धीला कळणारी नाहीत; (३) म्हणून धर्माचे ज्ञान करून देणारा वेद अपौरुषेय आहे. - याप्रमाणे श्री. दप्तरीनी जुन्या लोकांच्या मताचे आपल्यास समजले तेवढे कारण देऊन नंतर आपल्या समजुतीनुसार धर्म पुरुषबुद्धिकल्पित कसा मानता येतो हे दाखविले आहे. त्यांचे म्हणणे असे आहे की, 'उभयत्रसुखदोर्कः' धर्म हा उभयत्र म्हणजे इहपरत्र सुख देतो असे मानिले म्हणजे पारलौकिक सुखाची निराळी साधने व ती पुरुषबुद्धिगम्य नाहीत म्हणून ती ईश्वरप्रणीत आहेत असे म्हणण्याचा द्राविडी प्राणायाम करावा लागत नाही व धर्म हा याप्रमाणे पुरुषबुद्धिगम्य ठरतो.

श्री. दप्तरीच्या आक्षेपाला जे आम्ही उत्तर देणार आहो ते समजण्याकरितां श्री. दप्तरीनी जो जुन्या मताचा थोडासा निर्देष केला आहे तेवढा अपुरा आहे असे आम्हाला वाटत असल्यामुळे, जुन्या लोकांच्या मताचा थोडासा उपन्यास करितो. जुन्या लोकांचे असे म्हणणे आहे की,

(१) धर्माच्या तात्त्विक सिद्धान्तांचा - म्हणजे तो कोठून उत्पन्न झाला, त्याचे स्वरूप काय वगैरे प्रश्नांचा विचार करावयाचा झाला असता मनुष्याला

वेदान्तशास्त्रात शिरल्याखेरीज गत्यंतर नाही, कारण वेदान्तशास्त्र म्हणजे कशाचेहि मूळ शोधणारे शास्त्र होय; आणि वेदान्त शास्त्राने या प्रश्नांचा विचार करून धर्म हा ईश्वरप्रणीत आहे असा अबाधित सिद्धान्त काढला आहे.

(२) प्रत्येक माणसात जी बुद्धी आहे ती मूळात अत्यंत शुद्ध आहे. पण इंद्रिजन्य सुखाच्या अभिलाषाने ती मलीन झाली आहे.

(३) तरी तिचा शुद्धपणा निःशेष नष्ट झाला नसल्यामुळे व विषयसुखाचा अभिलाष तिच्यात शिरल्यामुळे, ती दोन प्रकारची झाली. एक शुद्धरूप व दुसरी अशुद्धरूप.

(४) प्रत्येक जीव मग तो हिरण्यगर्भ का असेना, त्याचे ठिकाणी ही दोन प्रकारची बुद्धी प्रथम असतेच. कोणीही पुरुष प्रथमपासून अत्यंत शुद्धबुद्धीचा म्हणजे अशुद्ध बुद्धीवाचून राहतो असे मानता येत नाही.

(५) असा पुरुष मानणे म्हणजे पुरुष मानणे नसून ईश्वर मानणे होय.

(६) अत्यंत शुद्धबुद्धिच सर्व धर्माधर्मांच्या उत्पत्तीचे स्थान होय व हेच ईश्वरपद असल्यामुळे, सर्व धर्माधर्म ईश्वरप्रणीत आहेत असे जुने लोक म्हणतात.

(७) मनुष्यहि धर्मादिक साधनांच्या अनुष्ठानाने आपल्या बुद्धीतील अशुद्धपणा निःशेष नाहीसा करून अत्यंत शुद्ध बुद्धिस्वरूप होऊ शकतो व नंतर त्या बुद्धीच्या साह्याने धर्माधर्म जाणू शकतो.

(८) पण जोंपर्यंत मनुष्याची बुद्धि अत्यंत शुद्ध होत नाही, तोपर्यंत त्याच्या ठिकाणी अशुद्ध बुद्धीचेच प्राधान्य राहत असल्यामुळे, त्याच्या त्या मलिन बुद्धीने त्याला धर्माधर्मांचा निर्णय करिता येणे शक्य नाही;

(९) म्हणून मूळात एक असणाऱ्या व ईश्वरसंज्ञा धारण करणाऱ्या या शुद्ध बुद्धीशी, जोपर्यंत हा जीव आपल्या बुद्धीतील विषयसुखाभिलाषाचा मल नाहीसा करून, आपल्या बुद्धीला एकरूप करीत नाही तोपर्यंत याला जीव ही संज्ञा असून त्याला त्या मूळात एकरूप असलेल्या शुद्ध बुद्धीचा आदेशच प्रमाण मानावा लागतो व धर्माधर्माच्या भानगडीच्या प्रसंगी शुद्ध बुद्धीच्या सत्पुरुषाच्या वचनानुसार वागावे लागते.

(१०) सारांश, धर्म हा ईश्वरप्रणीतच ठरतो.

हे झाले जुन्या लोकांचे मत. आता आपण श्री. दप्तरींच्या मताचा विचार

३

करूं. प्रत्येक नव्या लोकाप्रमाणे श्री. दप्तरीना धर्माचे साध्य केवळ ऐहिक सुखच मान्य नसून ऐहिकाबरोबर पारलौकिक सुखहि त्यांना धर्मांचे ध्येय म्हणून मान्य आहे. पण लगेच पुढे 'ह्या लोकातील लोकयात्रा हे ऐहिकच धर्माचे साध्य मानिले म्हणजे धर्म हा बुद्धिगम्य ठरतो' असेहि ते म्हणतात. हा त्यांचा संदिग्धपणा व भारतातील वचनांचा केलेला विलक्षण अर्थ ह्यांचा आम्ही येथे फुकट खल करीत बसत नाही; व श्री. दप्तरीना ऐहिक सुखाबरोबर पारलौकिक सुखहि धर्माचे ध्येय म्हणून मान्य आहे, असे धरून चालतो, व त्यांच्या मताचा विचार करितो.

श्री. दप्तरीच्या मतातून पुढील मुद्दे निघतात व त्यांचा विचार झाला म्हणजे मत परीक्षण झाले. म्हणून त्यांनी स्वतः दिलेले मुद्दे घेऊनच आम्ही त्यांच्या मताची परीक्षा करितो.

(१) ह्या लोकातच लोकयात्रेकरिताच किंवा ऐहिक सुखाकरिताच (अर्थात् खऱ्या सुखाकरिताच) धर्म आहे.

(२) तो धर्म बुद्धिगम्य आहे.

(३) ह्या बुद्धिगम्य धर्माप्रमाणे मनुष्य जे कांही करील, त्याने त्याला खरे ऐहिक सुख तर मिळेलच, पण पारलौकिक सुखही मिळेल.

(४) धर्माधर्मनिर्णयाच्या वेळी कोणाच्याही वचनात जे सांगितले असेल त्यापेक्षा बुद्धीने जे ठरेल ते श्रेष्ठ आहे.

याप्रमाणे श्रीयुत दप्तरीचें मत आहे. आता या मताचे निरीक्षण करू.

मुद्दा पहिला :-

श्री दप्तरींना मुख्यतः ऐहिक सुख म्हणजे इंद्रियजन्य सुख हेच धर्माचे ध्येय मान्य आहे, व ते ध्येय ज्या बुद्धीत बद्धमूल झालेले आहे ती बुद्धिच धर्माधर्माला जाणू शकते असे म्हणतात. आमचे म्हणणे असे आहे की,

भूतभव्यार्थमेवेह धर्मप्रवचनं कृतम् । (भारत शांतिपर्व अ.२६२-३५)

भूत म्हणजे सिद्ध वस्तु जे ब्रह्म त्याच्या प्राप्तीकरिता व उत्पन्न होणाऱ्या सुखाकरिता म्हणजे इंद्रियजन्य सुखाकरिता धर्म निर्माण झाला नाही. इंद्रियजन्य सुख हे खरे सुख व श्रेष्ठ सुख नव्हे. 'लोकयात्रा' या शब्दाचा अर्थ व **धारणाद्धर्ममित्याहुः ।** - इत्यादि वचनातील धारण शब्दाचा अर्थ एकच आहे आणि तो अर्थ 'ऐहिक

विषयसुखच' असा नाही. त्याचा अर्थ 'आत्मकल्याणाच्या आड न येणारे विषयसुख भोगणे' असा आहे. समाजाचे मन आत्मकल्याणाला विन्मुख होऊन ऐहिक सुखाला श्रेष्ठ मानू लागले की, वादळात सांपडलेल्या तारूची जी अवस्था होते तीच अवस्था समाजाची होते. म्हणून खरे सुख किंवा श्रेष्ठ सुख म्हणजे इंद्रियजन्य सुख नसून आत्मसुखच श्रेष्ठ पण त्याच्याच प्राप्तीकरिता मुख्यतः धर्म निर्माण झाला. हे आमचे विधान श्री. दप्तरीना पटणार नाही व आमचे म्हणणे खरे की स्वतःचे म्हणणे हे निवडता येणार नाही तर त्यांनी स्वतः म्हटल्याप्रमाणे व्यवहारांत त्यांच्यापेक्षा बुद्धीने श्रेष्ठ असणाऱ्या लोकमान्यांचें या बाबतीत काय मत आहे हे पाहावे, म्हणजे सहज निवाडा होऊन त्यांना आपली चूक कळून येईल. केवळ कर्माच्या बाह्य परिणामावरून म्हणजे इंद्रियजन्य सुखावरून धर्म ओळखता येत नाही हे लोकमान्यांनी उत्तम सिद्ध केले आहे.

पुनः धर्माचे फल ऐहिक सुख घ्या किंवा मोक्षसुख घ्या. पण हे देणार कोण? जो फल देणार असतो तोच नियम करणारा असतो; असा सर्वसामान्य नियम असल्यामुळे, धर्माचे फल कोण देतो याचा विचार केला पाहिजे. कर्म हे स्वतः क्रियारूप असल्यामुळे, व उत्पन्न होऊन नाश पावणारे जडरूप असल्यामुळे, कर्म हे कर्त्याला फळ देऊ शकत नाही; किंवा फल हे कर्माची स्वाभाविक परिणामावस्थाही नव्हे. तेव्हा कर्मफल कोण देतो ? कर्म करणाराच आपल्या धर्माचे फल घेऊन घेतो म्हणावे तर तेही जुळत नाही. कारण तसे पाहण्यात नाही.

उदारहणार्थ - गरीबाला दान देणारा एक मनुष्य आहे. गरीबाला दान दिल्याने याला जो धर्म घडला त्याचे फल या देणाऱ्याला जे मिळेल ते कोण देणार? हिंसा न करणाऱ्याला त्याच्या अहिंसेचे, खोटे न बोलणाऱ्याला त्याच्या सत्याचे फळ कोण देणार? कर्माचे फळ देतेवेळी, कर्त्याची सुष्ट-दुष्ट मनोवृत्ती, वासना, प्रसंग यांचा विचार करून ज्याच्यावर क्रिया झाली त्याची त्या वेळची मनोवृत्ती, वासना, प्रसंग जमेस धरावे लागतात व या सर्व गोष्टींचा विचार करून कर्माचे फळ द्यावे लागते. इतक्या गोष्टी कोणाला साधणार? ह्या सर्व गोष्टी जीवाच्या सामर्थ्यापलिकडे आहेत म्हणून ईश्वरच कर्मफलदाता व धर्मवक्ता मानावा लागतो.

धर्म करणाऱ्याला धर्म करण्यात जे समाधान असते तेच त्याच्या धर्माचे फल होय, असे मानिले तर हे काही ऐहिक सुख म्हणजे इंद्रियजन्य सुख नव्हे. पुनः हे सुख तर कृपणाला किंवा अधार्मिकाला देखील लाभू शकते. कारण धर्म करणाऱ्याला धर्म केला असता जे सुख होते तेच सुख कृपणाला पैसा न खर्चला असता होते व अधार्मिक पुरुषाला अधर्म घडला असता होते. खरे बोलणाऱ्याला कोणीही फसवीत नाही, हे त्याला त्याच्या सत्याचे फल मिळते व ते फल लोक देतात असे म्हणावे तर तेही योग्य नाही; कारण, सर्व जगाला ह्याचे सत्यवक्तृत्व एकदम कसे कळणार? व जसे जसे कळून येईल तसे तसे लोक पुढे त्याला फसविणार नाहीत असे म्हटल्यास, सत्य वक्तृत्व कळून येईपर्यंत मधून मधून लोक त्याला फसवितीलही. मग कांही सत्य बोलण्याचे फल मिळेल व कांहीचे मिळणार नाही. याप्रमाणे कर्मफलसंबंधाला बाध येतो. अत्यंत सत्य बोलणाऱ्याची ती मनोवृत्ती, ज्याच्याशी त्याचा संबंध येत जाईल त्याला ती कळत जाते, असे मानिल्यास, ह्या मानसिक घडामोडीची व्यवस्था सर्वान्तर्यामी चैतन्याच्या द्वारा लाविल्याखेरीज भागत नाही. योगशास्त्रात अहिंसेचे निर्वैरत्व, सत्य म्हटल्याप्रमाणे घडून येणे; इत्यादि निरनिराळ्या कर्मांचे स्वतंत्र फल सांगितले असून, '**चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती ॥**'हे तुकाराममहाराजांचेहि वचन आहे. भारतात तुलाधारानेही जाजलीस अहिंसेच्या वरील फलाचा प्रत्यय आणून दिला आहे. सारांश, जीवाला केलेल्या कर्माचे फल ईश्वरद्वाराच मिळत असल्यामुळे व फल देणाराच निर्बंध घालणारा ठरत असल्यामुळे, धर्म ईश्वरप्रणीतच ठरतो.

मुद्दा दुसरा :-

बुद्धिगम्य धर्म आहे, हा दुसरा मुद्दा आहे. धर्म बुद्धिगम्य नाही असे आम्ही म्हणत नाही. पण अत्यंत शुद्धबुद्धीलाच तो कळू शकतो, असे आमचे म्हणणे आहे,

नाकृतात्मा वेदति धर्माधर्मविनिश्चयम् ।

शुद्धबुद्धीवाचून धर्माधर्म कळत नाहीत;

सर्वमात्मनि संपश्यन्नाधर्मे कुरुते मनः ।

सर्व विश्व आत्म्याचे ठिकाणी पाहाणाऱ्याचे मन अधर्माकडे जात नाही, म्हणजे त्यांच्या चित्तात धर्मच स्फुरतो - इत्यादि वाक्यात भारतकारांनी व मनूनी हेच सांगितले आहे.

तस्मात्कौन्तेय विदुषा धर्माधर्म विनिश्चये ।
बुद्धिमास्थाय लोकेऽस्मिन् वर्तितव्यं कृतात्मना ॥

म्हणून राजा, धर्माधर्मनिर्णयाची भानगड पडल्यास आत्मज्ञानी (कृतात्मना) पुरुषाने आपल्या शुद्धबुद्धीचा उपयोग करावा. असे भीष्मांनी धर्मराजास सांगितले आहे. याप्रमाणे धर्माधर्म निश्चयाचे बाबतीत शुद्धबुद्धी योग्य ठरवून,

न धर्मवचनं वाचा नैव बुद्ध्या नः श्रुतम् ।

केवळ शास्त्रानेच किंवा केवळ बुद्धीनेच धर्म कळत नाही.

आगतागमया बुद्ध्या वचनेन प्रशस्यते ।

आगतागमया म्हणजे आगतः आगमः यस्याम् । आगमनानुग्रहीत बुद्धीने युक्त असे जे वचन ते सांगणारे शास्त्रप्रमाण होय. इत्यादि वचनात भगवान् भारतकारांनी जीवाच्या अशुद्ध बुद्धीला धर्माधर्मनिर्णयाचे कामी नालायक ठरविणे, शेवटी २६२व्या अध्यायात 'तर्काने धर्माची जिज्ञासा करू नकोस, श्रेष्ठ पुरुष सांगतील तसा आंधळ्याप्रमाणे वागू लाग' असे भीष्मांनी धर्मराजास बजावून सांगितले. यातही जीवाची अशुद्धबुद्धी धर्म जाणू शकत नाही हेच दाखविले आहे.

श्री. दप्तरींनी प्रमाणार्थ घेतलेल्या वचनांचे जे कित्येक ठिकाणी अर्थ केले आहेत ते कसे विलक्षण केले आहेत हे संस्कृतज्ञांनी मूळातून वाचून पाहाण्याजोगे आहेत. एक दोन श्लोकाचे अर्थही रा. दप्तरींनाच समजण्याजोगे आहेत, असो. सर्व आर्षशास्त्रांच्या मते ''शुद्धबुद्धीच धर्म जाणू शकते व अशुद्धबुद्धीला शुद्धबुद्धीच्या आज्ञेनेच वागावे लागते.'' म्हणून ज्ञानी पुरुषाला धर्म प्रत्यक्ष दिसत असला तरी सर्वसाधारण पुरुषांना चोदना म्हणजेच धर्म आहे. हेच मत लोकमान्यांनाही मान्य आहे, व भक्ती, ज्ञान, वैराग्याखेरीज बुद्धी शुद्ध होत नाही असे सर्व शास्त्रांचे व त्याप्रमाणे लोकमान्यांचेही मत आहे. पण याप्रमाणे धर्म हा शुद्धबुद्धिगम्य आहे असे मानिले म्हणून कांही तो पुरुषबुद्धिकल्पित ठरू शकत नाही, तो ईश्वरप्रणीतच ठरतो. कारण प्रत्येक जीव अशुद्ध बुद्धियुक्तच असल्यमुळे, व भक्तिज्ञानवैराग्यादि साधनानुष्ठानानेच त्याला आपली बुद्धी शुद्ध करून घ्यावी लागत असल्यामुळे, धर्मादि साधने नित्य शुद्धबुद्धीयुक्त असणाऱ्या परमेश्वरापासूनच प्रगट झाली असे मानणे भाग पडते. अहिंसा, सत्य, अस्तेय इत्यादि धर्म आपण आचरतो, किंवा त्याच्या मनोवृत्ती आपल्या ठिकाणी स्वभावतःच आहेत. एवढ्यावरून जीव त्याचा प्रणेता होऊ शकत नाही. कारण आपल्या ठिकाणी असणाऱ्या ह्या वृत्ती शुद्धबुद्धीच्या आहेत व ही शुद्धबुद्धी आपल्या ठिकाणी असणाऱ्या अंतर्यामी ईश्वराची उपाधी आहे, म्हणून हे अहिंसादि सर्वसाधारण धर्म देखील ईश्वरप्रणीतच ठरतात, जीवकल्पित ठरू शकत नाही. जीव म्हणजे अशुद्ध बुद्धीचा अभिमानी किंवा तिच्या तंत्राने चालणारा. हे प्रत्यक्ष कळणारे धर्म जर ईश्वरप्रणीत ठरतात तर संध्यावंदनासारखी कर्मे जीवकल्पित ठरत नाहीत, हे काय सांगावयाचे? त्याचप्रमाणे,

इष्टान् भोगान् हि वो देवा दास्यन्ते यज्ञभाविताः ।

इत्यादि श्लोकात सांगितलेला परलोकातील देवताविषयक आचारविधी पुरुषबुद्धिगम्य कसा ठरेल?

धर्म हा साधारण माणसाच्या (म्हणजे धर्म, ज्ञान, भक्ती इत्यादि साधनांचे अनुष्ठान न करणाऱ्यांच्या) बुद्धीलाही कळू शकतो असे मानिल्यास मग धर्माविषयी मतभेद कां व्हावा? किंवा कळणे तरी कसे शक्य आहे ? कारण मनुष्याला कर्मफलाचा संबंध जोडता येत नाही. एखाद्याने चोरी केली असता न्यायाधीशाप्रमाणेच कायद्याचे ज्ञान असणाऱ्या वकिलाला देखील हा नक्की सुटेल किंवा नाही, हे शिक्षा झाली तर किती, कोणती होईल हे नक्की सांगता येत नाही, त्याप्रमाणे जीवालाही कर्म-फलाचा संबंध कळत नाही. मग फल कळल्याखेरीज तो धर्माधर्म तरी कसा ठरविणार? व्यवहारातील श्रेष्ठ बुद्धीच्या पुरुषांना धर्म कळतो असे म्हणावे तर असा कोण पुरुष घ्यावयाचा? जो तो आपल्याला श्रेष्ठ समजतो. बरे, बुद्धी तरी कशामुळे सूक्ष्म व्हावयाची? भौतिक शास्त्रामध्ये प्रवीण असलेली बुद्धी श्रेष्ठ म्हणावी तर हे म्हणणे लोकमान्यांसारख्या व्यावहारिक बुद्धिमानासही पटत नाही व आर्ष शास्त्रकार तर याला संमतिच देत नाहीत. बरे, एखादा नवसुशिक्षित जर ज्ञानादि साधनांच्या अनुष्ठानाचा आव आणून माझी बुद्धी मला 'धर्म बुद्धिगम्यच' आहे व 'पुरुषकल्पित' आहे असे सांगते असे म्हणू लागले, तर आम्ही विचारतो, बाबा! ज्या पूर्व ऋषिजनांविषयी 'अत्यंत सूक्ष्म बुद्धीचे पुरुष' म्हणून लोकमान्यांसारखे देखील उद्गार काढतात ते व आधुनिकही थोर थोर संत महात्मे जे भक्तिज्ञानाचे आगर म्हणून गाजलेले ते, ह्यापैकी कोणीही ते कबूल केले नाही. उलट सर्व शास्त्रे ईश्वरप्रणीत आहेत असे कंठरवाने ते सांगतात, तेव्हा ह्या सर्व महात्म्यांचे मतैक्य कां व तुझा मात्र सिद्धान्त निराळा कां? सर्व सूक्ष्म बुद्धीच्या पुरुषांचा एकच सिद्धान्त असायला पाहिजे. भारतकारांनाही धर्म हा पुरुषबुद्धिकल्पित आहे हा सिद्धान्त

मान्य असता तर त्यांनीच नारायणीय धर्माच्या निरूपणामध्ये -

युगान्तेऽन्तर्हितान् वेदान्सेतिहासान् महर्षयः ।
लेभिरे तपसा पूर्वमनुज्ञाता स्वयंभुवा ॥

म्हणजे ''प्रलयकाली वेदादि सर्व शास्त्रे परमेश्वराचे ठिकाणी लीन झाली व नंतर सर्गारंभी पुनः ब्रह्मदेवाच्या संमतीने निरनिराळ्या ऋषीनी ती तपाने प्राप्त करून घेतली'' हे कशाला सांगितले असते. स्मृतिग्रंथाबद्दलही ईश्वर प्रसादाने ते ज्ञान प्राप्त झाल्याचे सांगितले आहे.

सारांश, दोन विरोधी वचनांची एकवाक्यता करण्याकरिता किंवा दोन भिन्न धर्मांपैकी प्रस्तुत कोणता धर्म योग्य? हे ठरविण्याकरिता साधारण बुद्धीला अप्रसिद्ध धर्म कळतो किंवा धर्म हा पुरुषबुद्धिकल्पित आहे हे मत भारतकारांस मान्य नसून श्री. दप्तरी त्यांच्यावर लादू पाहत आहेत. भगवान् भारतकारांस धर्म हा जीवाच्या बुद्धीस कळू शकतो असे मान्य असते तर,

जिज्ञासा न तु कर्तव्या धर्मस्य परिकर्तनात् ।

'तर्क करून धर्माची जिज्ञासा करू नये' असा त्यांनी बुद्धीचा निषेध केला नसता. धर्मजिज्ञासेत प्रत्यक्ष व अनुमान श्रेष्ठ मानून त्याचा उपयोग करणारी बुद्धी धर्मनिर्णयाचे कामी रा. दप्तरी श्रेष्ठ मानतात. - पण भारतकारांनी जे अनुशासनपर्वात धर्माच्या दर्शनाला कारणीभूत असणारे प्रत्यक्ष प्रमाण घेतले आहे, ते कांही इंद्रियजन्य प्रत्यक्ष ज्ञान नव्हे, किंवा अशुद्ध मनाला कळणारे प्रत्यक्ष दर्शन नव्हे, तर -

शक्यं दीर्घेण कालेन युक्तेनातन्द्रितेन च ।
प्राणयात्रामनेकां च कल्पमानेन भारत ।
तत्परेणैव नान्येन्य शक्यं ह्येतस्य दर्शनम् ।
हेतूनामंतमासाद्य विपुलं ज्ञानमुत्तमं प्रतिपद्यते ॥

राजा ! तर्क सोडून देऊन आळसरहित समाहित चित्ताने व ह्याच एका साधनाने विपुल ज्ञान प्राप्त होते व त्याच्या योगाने धर्माचे निरनिराळ्या कल्पातील प्राण्यांच्या लोकयात्रेचे ज्ञान होते,' या वचनात सांगितल्याप्रमाणे शुद्धबुद्धीचे प्रत्यक्ष ज्ञान होय, हे उघड आहे.

या श्लोकात 'हेतूनामंतमासाद्य' या पदाचा अर्थ श्री. दप्तरी 'तर्काच्या शेवटल्या पायरीवर जाऊन' असा करितात. पण या त्यांच्या अर्थात तर्काच्या शेवटल्या पायरीवर जर पुनः तर्क राहतच असेल तर वरील वचनाशीच विरोध येतो. कशाचाही शेवट म्हणजे त्याची समाप्तीच असते. म्हणून तर्काचा अंत किंवा शेवट म्हणजे तर्क सोडून असाच अर्थ करावा लागतो. स्वतः भारतकारांनी धर्मादि ज्ञान आपण कसे प्रत्यक्ष करून घेतले, त्याचे नारायणीय धर्म सांगताना शांतिपर्वाच्या ३४० व्या अध्यायात जे वर्णन केले आहे, ते असेच आहे.

सारांश, धर्म मानुषबुद्धीस म्हणजे इंद्रियजन्य सुखाचा अभिलाष धरणाऱ्या बुद्धीस कळत नाही, तो ईश्वरबुद्धीस म्हणजे शुद्धबुद्धीस प्रत्यक्ष होतो, हेच सिद्ध होते. असे मानिले म्हणजे धर्म किंवा धर्मग्रंथ पुरुष (जीव) बुद्धिकल्पित आहेत असे म्हणता येत नाही.

<u>मुद्दा तिसरा</u> :-

'बुद्धिगम्य धर्माप्रमाणे मनुष्य जे कांही करील, त्याने त्याला खरे ऐहिकसुख तर मिळेलच पण पारलौकिक सुखहि मिळेल' असे श्री. दप्तरी म्हणतात. वर दाखविल्याप्रमाणे मनुष्यामध्ये जो कांही त्याच्या अशुद्ध बुद्धीचे खाली दडपलेला शुद्धबुद्धीचा अंश आहे, तेवढ्याच अंशापासून सुचविले जाणारे अहिंसा, सत्य, अस्तेय इत्यादिकांसारखे जे सर्वसाधारण धर्म, त्या धर्माच्या अनुष्ठानाने इहलोकातील सुखाबरोबर पारलौकिक सुखही मिळेल यात शंका नाही. पण एवढ्यावरून धर्म हा पुरुषबुद्धिकल्पित आहे हे कसे ठरू शकते? येथे केलेल्या धर्मानेच परलोकात सुख मिळते असे मानिल्याबरोबर, येथे करावा लागणारा धर्म, परलोकचा जो स्वामी असेल त्यानीच निर्माण केला असे मानणे भाग पडते; कारण परलोकातील सुख देखील विषयसुखच असल्यामुळे, ते देणार कोण? केलेला धर्म क्रियारूप असल्यामुळे येथेच संपून जाणारा. म्हणून पुढे परलोकात सुख देण्याकरिता तो राहू शकत नाही; आणि दुसऱ्याला सुख देणे म्हणजे त्याला अनुकूल असलेली गोष्ट किंवा क्रिया करणे होय; आणि हा चेतनाचा व्यापार असल्यामुळे, कोणत्याही जड पदार्थाकडून आपोआप तो व्यापार होणे शक्य नाही. येथे धर्म करून मेलेल्या जीवाला परलोकात त्याच्या इच्छेनुसार इष्टविषय संयोगरूप क्रिया करून सुख देणारा, ईश्वरचेतनावाचून दुसरा कोणी संभवत नाही. ईश्वरच जीवाच्या इहलोकातील धर्माचे परलोकात फल देतो असे मानिले की, धर्म

ईश्वरप्रणीत ठरतो. कारण जीवाने धर्मनियम करावा व ईश्वराने त्याचे परलोकात फळ द्यावे हे म्हणणे, नोकराने कायदा करावा व राजाने त्याची अंमलबजावणी करावी असे व्यवहारदृष्ट्या अत्यंत विसंगत आहे. जो अंमलबजावणी करितो तोच कायदा करीत असतो, व जो कायदा करितो तोच त्याची सुखदुःखरूपाने अंमलबजावणी करू शकतो; त्याचप्रमाणे ज्याला कायद्याचे नियंत्रण असते तो कायदा करणारा असे केव्हाहि समजले जात नाही, हा सर्वसाधारण अबाधित नियम आहे.

हल्लीच्या कायदेमंडळांचा विचार केला तरी हेच तत्त्व सिद्ध होते. कायदेमंडळातील एखाद्या सभासदाने एकादा कायदा मंजूर करून घेतला म्हणून तो कायदा त्याने केला असे होत नाही. कारण सभासदाचे ठिकाणी असलेला ठराव मांडण्याचा अधिकार, मंडळाच्या ठिकाणचा मंजूर करण्याचा अधिकार, व अधिकाऱ्यांच्या ठिकाणी असलेला अंमलबजावणीचा अधिकार, हे सर्व अधिकार एका नियामक सत्तेचे असून, सभासद, मंडळ, अधिकारी हे सर्व त्या सत्तेच्या निरनिराळ्या कार्यशक्तीची द्वारे आहेत. म्हणून कायदा करणे व त्याची अंमलबजावणी करणे हे ज्याप्रमाणे एकाच राजसत्तेचे काम असते, त्याप्रमाणे धर्म निर्माण करणे व त्याचे फल देणे हे एकाच चेतनाचे काम असू शकते. हे चेतन म्हणजे जीवचेतन होय असे म्हणता येत नाही, कारण इहलोकातच त्याची सत्ता नाही तर परलोकावर त्याचे स्वामित्व कसे असणार? म्हणून धर्म निर्माण करून धर्माचे फल देणारे चेतन जीव वगैरे नसून ईश्वर चेतनच होय असेच म्हणणे भाग आहे.

मुद्दा चवथा :-

धर्माधर्मनिर्णयाचे वेळी कोणाच्याही वचनात जे सांगितले असेल त्यापेक्षा बुद्धीने जे ठरेल ते श्रेष्ठ आहे असे श्री. दप्तरी म्हणतात. अत्यंत आपत्काली,

धर्माद् वृत्तिर्गरीयसी ।

धर्मापेक्षा पोटाची तरतूद आधी करावी हाच धर्म असल्यामुळे बुद्धी जे सांगेल ते करावे हे कांही खोटे नाही. पण ह्याही वेळी आपणाला आपला धर्म पाळणे अत्यंत अशक्य आहे काय? १. मी अत्यंत निरुपाय म्हणून धर्माला दूर करीत आहे, किंवा २. नास्तिक होऊन त्याचा अव्हेर करीत आहे, अथवा ३. स्वैरवर्तन करावेसे वाटते पण धर्म आड येतो. म्हणून त्याचा काटा काढून टाकण्याची इच्छा करीत आहे, या सर्वप्रश्नांचा योग्य विचार केला पाहिजे. 'धर्माद् वृत्तिर्गरीयसी' हा धर्मनियम निरुपायाचे वेळचा आहे. हे शांतिपर्वांतर्गत आपद्धर्मातील विश्वामित्र - चांडालसंवादावरून उघड होते. साधारण माणसाची बुद्धी (आत्मज्ञानी पुरुषावाचून आम्ही सर्व पुरुषांना साधारणच म्हणतो) धर्माधर्मनिर्णयाचे बाबतीत उपयोगी नाही हे सर्वशास्त्रसंमत असून लोकमान्यांसारख्या आधुनिक विद्वानांसही मान्य आहे. धर्म, ज्ञान, भक्ती वगैरे साधनांच्या अनुष्ठानाने अत्यंत शुद्ध झालेली बुद्धी सर्वात श्रेष्ठ प्रमाण आहे, ह्याबद्दल वादच नाही. आणि ह्याच बुद्धीला 'ईश्वर' ही संज्ञा असल्यामुळे, धर्म ईश्वरनिर्मित आहे असे आम्ही म्हणतो. बुद्धी जोपर्यंत शुद्ध झाली नाही तोपर्यंत,

ब्राह्मणानेव सेवेत विद्यावृद्धान् तपस्विनः ।
श्रुतचारित्रवृत्ताढ्यान् पवित्रं ह्येतदुत्तमम् ॥

'ज्ञान, आचार ह्यांनी संपन्न, तपस्वी अशा ब्राह्मणांची सेवा करून ते जसा धर्मनिर्णय करतील तसा वाग' हा भीष्मांनी केलेला उपदेशच सर्वसाधारण जनांना धर्माधर्माच्या निर्णयाकरिता उपयोगी आहे.

सारांश, धर्माधर्मनिर्णयाचे कामी शुद्धबुद्धी स्वतंत्र असून अशुद्धबुद्धी शास्त्राचे वचनाधीन किंवा शुद्धबुद्धीच्या महात्म्यांच्या वचनाचे आधीन आहे असा भारतातील शांतिपर्व व अनुशासनपर्व ह्यातील वचनांचा भाव आहे. म्हणून जुनेच मत योग्य आहे असे आम्ही म्हणतो.

ooo